!! यशोगाथा.!!

नाव-: नरेश शामराव सावंत

पत्ता-: मु पो. वाळवा ता. वाळवा जि. सांगली (चांदोली वसाहत)

शिक्षण-: बी.ए.

खेळ-: खो-खो

माझे मूळ गाव चांदोली,शिराळा तालुक्यातील असून या ठिकाणी सध्या चांदोली धरण बांधले आहे. आमचे विस्थापन होत असताना आणि विस्थापन झाल्यावरही आम्हाला काही महिने कोणत्याही प्रकारच्या सुविधा दिल्या गेल्या नाहीत.डोक्यावर छप्पर नव्हतेच पण पोटाला पुरेसे अन्नही नव्हते.अशा वातावरणात आम्हा सर्व धरणग्रस्त लोकांची जगण्यासाठी धडपड चालू होती. त्यामध्ये आमच्याही आई-वडिलांचा समावेश होता.

माझे प्राथमिक शिक्षण १ ली ते ४ थी जिल्हा परिषद शाळा,चांदोली वसाहत,वाळवा या ठिकाणी पूर्ण झाले. हे प्राथमिक शिक्षण घेत असताना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागले कारण आम्ही धरणग्रस्त असल्यामुळे डोक्यावर छप्पर ही मिळाले नव्हते तसेच आई-वडिलांना आपल्या मुलांना शिक्षण देणे फार कठीण झाले होते. त्या परिस्थितीतही शेतमजुरी करून आई-वडिलांनी आम्हाला शिकण्याची संधी दिली.

माझे पुढील शिक्षण ५ वी ते १२ वी हुतात्मा किसन अहिर विद्यालय वाळवा, या ठिकाणी पूर्ण झाले तसेच २००० साली मी खो-खो हा खेळ खेळण्यास सुरुवात केली. आमचे मार्गदर्शक मा.कै.अशोक कदम सर यांनी मी ग्राउंड वर खेळताना माझ्या अंगातील क्रीडा गुण ओळखून त्यांनी मला खो-खो या खेळाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली. ५ वी ते ७ वी या वर्गात शिकत असताना मी खो-खो खेळाचा सराव चांगल्या पद्धतीने करण्यास सुरुवात केली.

२००४ साली १४ वर्ष वयोगटात खो-खो स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाला प्रथम क्रमांक मिळवून दिला.

तसेच आजपर्यंत अनेक राष्ट्रीय खो-खो स्पर्धा खेळलो,त्यामध्ये प्रामुख्याने उल्लेख करावासा वाटतो तो २०११ साली नाशिक येथे झालेल्या ४८ वी पुरुष-महिला राज्य अजिंक्यपद खो-खो स्पर्धेचा. कधीही राज्य अजिंक्यपद स्पर्धा हरला नाही असा मुंबई संघ त्यांच्याबरोबर पहिल्यांदाच मला खेळण्याची संधी मिळाली आणि ती संधी मिळताच सांगली जिल्ह्यासाठी आम्ही ४८ वर्षानंतर फायनल जिंकण्याचा बहुमान मिळवला व त्या ठिकाणी मला सर्वोत्कृष्ट खेळाडू चा बहुमान मिळाला.ती आमच्यासाठी खो-खो क्षेत्रातील सर्वात मोठी कामगिरी होती. तसेच त्या ठिकाणी राष्ट्रीय खो-खो स्पर्धेसाठी माझी पहिल्यांदा सीनियर गटासाठी निवड झाली.

तसेच आजपर्यंत खालील स्पर्धा खेळलो.

१) २०१६ साली ३ री एशियन चॅम्पियनशिप खो-खो स्पर्धा (इंदौर)
२) १५ राष्ट्रीय खो-खो स्पर्धेमध्ये सहभाग.
३) नॅशनल गेम्स खो-खो स्पर्धा.२०१५
४) ३ अखिल भारतीय खो-खो विद्यापीठ स्पर्धा.
५) १५ राज्य स्तरावरील खो-खो स्पर्धा.

स्व.अरुण (भैय्या) नायकवडी युवा मंच वाळवा. हा माझा क्लब असून इथूनच माझे खो-खो चे धडे सुरू झाले. शालेय स्पर्धा खेळताना व क्लब स्पर्धेमध्ये सहभागी होताना माझ्या मंडळाचा खूप मोलाचा वाटा आहे. आमचा खेळ हा सांघिक खेळ असल्यामुळे सर्व खेळाडू एकत्र आल्यावर खेळला जातो,त्यामुळे माझ्याबरोबर सराव करणाऱ्या माझ्या मित्रांचाही माझ्या यशामध्ये मोलाचा वाटा आहे.

स्पर्धा खेळत असताना २०१२ साली महाराष्ट्र इलेक्ट्रिसिटी बोर्ड या कंपनीमध्ये खेळाडू कोट्यातून नोकरी मिळाली. नोकरी करत असताना अनेक अडचणी समोर आल्या होत्या. मग ते त्या ठिकाणची कामाची पद्धत असो किंवा माझ्या प्रॅक्टिस साठी मिळणारा अपुरा वेळ असो यांचे गणित काही जुळत नव्हते. त्यातूनही मी माझे काम करत खो-खो चे प्रॅक्टिस सुरुच ठेवले,आणि २०१६ साली ३ री एशियन चॅम्पियनशिप खो-खो स्पर्धेमध्ये भारतीय संघाला सुवर्णपदक मिळवून दिले.

या स्पर्धेमध्ये सुवर्णपदक मिळवल्याबद्दल महाराष्ट्र सरकारने एक मोठा निर्णय घेतला.असे खेळाडू ज्यांनी महाराष्ट्राच्या क्रीडा क्षेत्राचे आणि देशाचे नाव मोठे केले आहे.अशा खेळाडूंना शासनाने डिसेंबर २०२४ रोजी,शासन सेवेत -थेट नियुक्ती दिलेली आहे. त्यामध्ये मला क्रीडा कार्यकारी अधिकारी या पदावर शासन सेवेत थेट नियुक्ती दिली आहे.आणि त्याचा मला सार्थ अभिमान आहे. मला अजून एक अभिमान वाटतो की मी एक खेळाडू आहे आणि क्रीडा विभागातच नोकरीसाठी मला महाराष्ट्र शासनाने संधी दिली ही खरोखरच उल्लेखनीय बाब आहे, कारण मी माझ्यासारखे अजून काही खेळाडू घडवून महाराष्ट्राला आणि या देशाला जास्तीत जास्त सुवर्णपदक मिळतील यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न करीन.तसेच मी महाराष्ट्र शासनाचे खूप खूप आभार मानतो.

मला मिळाले आजपर्यंतचे पुरस्कार.

१) २०१५-१६ ला महाराष्ट्र शासनाच्या शिवछत्रपती पुरस्काराने सन्मानित.
२) २०१६ ला कोकण क्रीडा रत्न पुरस्कारने सन्मानित.
३) २०१२ ला सांगली जिल्हा क्रीडा पुरस्कार.
४) २०११ ला वसंतदादा जिल्हा क्रीडा पुरस्कार.